# महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ
## साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५

दूरध्वनी : ०२०-२९७०३२२८ ई-मेल : info@mahanhm.in

जाक्र.मराफऔवमं/का.व्य./मा.सु/३६६२८/२३
पुणे-५, दि. २१ /११/२०२३

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक
------------------(सर्व)

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
------------------(सर्व)

**विषय :-** **एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत काढणीपश्चात व्यवस्थापन घटकांतर्गत एकात्मिक पॅकहाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र (फक्त एकात्मिक शीतसाखळी मधील) व एकात्मिक शीतसाखळी घटकांतर्गत अंमलबजावणी सुचना निर्गमित करण्याबबत...**

**संदर्भ :-**१. मा. व्यवस्थापकीय संचालक, यांची मंजुर टिपणी दि.०६/०९/२०२१
२. राज्यस्तरीय कार्यकारी समितीचे दि.९ जुन, २०२३ रोजी झालेल्या सोळाव्या बैठकीचे इतिवृत्त दि.१३/०६/२०२३

सन २०२१-२२ मधील एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत काढणीपश्चात व्यवस्थापन घटकांतर्गतएकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र **(फक्त एकात्मिक शीतसाखळी मधील)** व एकात्मिक शीतसाखळी या घटकांच्या मार्गदर्शक सुचनांना संदर्भ क्र. १ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक यांची मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार काढणीपश्चात व्यवस्थापन घटकांच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना सर्व जिल्ह्यांना अंमलबजावणी करीता निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, राज्यस्तरीय कार्यकारी समितीचे दि. ९ जुन, २०२३ रोजी झालेल्या सोळाव्या बैठकीमध्ये महा-डीबीटीवर घटकनिहाय सुधारित वर्क फ्लो कार्यान्वित करणे व आवश्यकतेनुसार मार्गदर्शक सुचनांमध्ये बदल करण्यासमान्यता देण्यात आलेली आहे.

सध्यस्थितीत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत काढणीपश्चात व्यवस्थापन हा घटक महा-डीबीटी पोर्टलवर राबविण्यात येत असून सदर योजने करीता महाडीबीटी पोर्टलवर सुधारित वर्क फ्लो कार्यान्वित करण्यात आलेला असुन त्याप्रमाणे मार्गदर्शक सुचनांमध्ये बदल करण्यात आलेले आहेत. त्यानुसार काढणीपश्चात व्यवस्थापन घटकांच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना सर्व जिल्ह्यांना अंमलबजावणी करीता निर्गमित करण्यात येत आहेत. तरी, सर्व जिल्ह्यांने मार्गदर्शक सुचनेचे पालन करावे. सदरच्या मार्गदर्शक सुचना कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in तसेच www.mahanhm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**(डॉ.के.पी.मोते)**
**संचालक,**
**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि**
**औषधी वनस्पती मंडळ, पुणे.**

**प्रत:-** १. मा. अध्यक्ष, मराफऔवम तथा सचिव (कृषी), महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. कृषि उपसंचालक, आयुक्त कक्ष, कृषि आयुक्तालय पुणे- ४११००१ यांना माहितीस्तव.

# एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र (फक्त एकात्मिक शीतसाखळीमधील) व एकात्मिक शीतसाखळी

# मार्गदर्शक सूचना

## सन २०२३-२४

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान
# काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र (फक्त एकात्मिक शीतसाखळीमधील) व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्प उभारणीच्या मार्गदर्शक सुचना

## १. प्रस्तावना :-

राज्याच्या कृषी उत्पादनात फलोत्पादन पिकांचा महत्वाचा वाटा आहे. फलोत्पादन पिकांचे मुल्यवर्धन करून/प्रक्रिया करून शीतगृहांमध्ये साठवणूक करून फलोत्पादन पिके/ त्यांचे पदार्थ वर्षभर सर्व हंगामात उपलब्ध होऊ शकतात, ही बाब लक्षात घेऊन एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत (MIDH) एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र (फक्त एकात्मिक शीतसाखळीमधील) व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्प उभारणीसाठी शासनाकडुन अर्थसहाय्य देण्यात येते. उत्पादित फलोत्पादन, औषधी, सुगंधी मालाची साफसफाई, प्रतवारी व पॅकिंग करून दर्जा कायम ठेवून साठवणूक कालावधी वाढवणे तसेच मोठ्या प्रमाणावर फलोत्पादन पिकांच्या मालाची आवक वाढवून भाव कोसळणे या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याकरिता एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्प उभारणी प्रकल्पांना प्रोत्साहन व अर्थसहाय्य जलद गतीने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याकरिता सदरची प्रक्रिया अधिक सुटसुटीत व जलद पध्दतीने राबविण्यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

## २. काढणीपश्चात व्यवस्थापन घटक (POST HARVEST MANAGEMENT COMPONENTS) -

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत फलोत्पादन, औषधी व सुगंधी वनस्पती पिकांच्या विकासासाठी काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत बँक कर्ज परताव्याच्या स्वरूपात असलेल्या खालील घटक योजनांना लाभ देण्यात येतो.

१. एकात्मिक पॅक हाऊस कन्व्हेअर बेल्ट, संकलन व प्रतवारी केंद्र, वॉशिंग व ड्राईंग यार्ड आणि भारत्तोलन इ. सुविधांसह (Integrated Pack House with facilities for conveyer belt, sorting, grading units, washing, drying and weighing)
२. पुर्व शीतकरण गृह (Pre-cooling Unit) / फिरते पुर्व शीतकरण गृह (Mobile Pre-cooling Unit)
३. शीतखोली (स्टेजिंग) Cold room (staging)
४. शीतगृह (नविन) (Cold Storage Unit)
५. नविन तंत्रज्ञान राबविणे व शीतसाखळी आधुनिकीकरण (Technology induction and modernization of cold-chain)
६. शीतवाहन (Refrigerated Transport Vehicle)
७. रायपनिंग चेंबर (Ripening Chamber)
८. प्राथमिक प्रक्रिया केंद्र (Primary Processing Unit)
९. एकात्मिक शीतसाखळी (Integrated Cold Chain supply System)

## ३. उद्देश :-

१. मोठया प्रमाणावर उत्पादित होणा-या फलोत्पादन उत्पादनाचे बाजार नियंत्रण.

२. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती पिकांचा दर्जा कायम ठेवून साठवणूक कालावधी वाढवणे.

३. बाजारपेठेमध्ये फलोत्पादित औषधी व सुगंधी वनस्पतींच्या पुरवठयात सातत्य ठेवणे.

४. ग्राहकाला आवडीप्रमाणे सातत्याने चांगल्या दर्जाच्या मालाचा पुरवठा करणे.

५. फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पतीचा टिकाऊपणा वाढविणे.

## ४. पात्र लाभार्थी :-

- शेतकरी, शेतकरी उत्पादक गट, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट, नोंदणीकृत उत्पादक संघ (ज्यामध्ये कमीतकमी २५ सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, कंपनी, महानगरपालिका, सहकारी संस्था, सहकारी मार्केटिंग फेडरेशन, लोकल बॉडी, कृषि उत्पन्न बाजार समिती, पणन मंडळ, शासकीय विभाग, ग्रामपंचायत.
- शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक संस्था, शासन मान्य संस्था, सहकारी संस्था यांना प्राधान्यक्रम देण्यात येईल.
- वैयक्तिक शेतकरी, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट (ज्यामध्ये किमान १५ सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, कंपनी, शेतकरी गट यांचेसाठी अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत असून (Credit Linked Back Ended Subsidy) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.
- भागीदारी संस्था असल्यास भागीदारांपैकी एकाही भागीदाराची यापुर्वी अनुदानीत इतर काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली , शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्पात भागीदारी असल्यास पुनःश्च सदर भागीदार संस्थेस लाभ घेता येणार नाही
- सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (PSUs), शासकीय संस्था, राज्य सहकारी संस्था, नोंदणीकृत उत्पादक संघ (ज्यामध्ये कमीतकमी २५ सदस्य असतील) यांना अनुदान वगळता प्रकल्पाचा इतर खर्च स्वतः उभारणार असल्यास त्यांना बँक कर्जाची अट असणार नाही, मात्र त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम असल्याचे लेखापरिक्षण केलेल्या मागील सलग ३ वर्षाचे अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. तसेच त्यांना प्रकल्प किमतीतील स्वभांडवल उभारू शकतील याबबतचे पुरावे सादर करावे लागतील.

## ५. अर्थसहाय्याचे स्वरुप :-

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमता विचारात घेवुन केंद्र शासनाच्या मंजुर मापदंडानुसार ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी (शासन निर्णय क्र. डोंविका-२००९/प्र.क्र.६ का.१४८३, दि. १८ जानेवारी, २०१० नुसार अधिसुचीत केलेले क्षेत्र ) ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अर्थसहाय्य देय राहील.

## ६. अर्ज करण्याचाी पध्दत :-

शेतक-यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक राहील.

## राज्यस्तरीय छाननी वर्कफ्लो :-

शेतक-यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केल्यानंतर संबंधितांची ऑनलाईन पध्दतीने सोडतीमध्ये निवड झाल्यानंतर संबंधितांना अर्ज करावयाच्या वेळेस नोंदणी केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संदेश प्राप्त होतो. सोडतीमध्ये निवड झाल्यानंतर पुढील वर्कफ्लो प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

| **कागदपत्रे व बिले सादर करणे** | **कागदपत्रे व मोका तपासणी अहवाल छाननी** | **सविस्तर प्रकल्प अहवाल छाननी** | **बिले व मोका तपासणी** |
|---|---|---|---|
| १. शेतकरी :- इरादापत्राकरीता लागणारी कागदपत्रे अपलोड करणे → | २. कृषि उपसंचालक (जिल्हा):- पुर्व मोका तपासणी अहवाल अपलोड करणे ↓ | ७. प्रकल्प व्यवस्थापक (राज्य) तांत्रिक तपासणी अहवाल अपलोड करणे ↓ | १०. प्रकल्प व्यवस्थापक (राज्य) संयुक्त मोका तपासणी अहवाल अपलोड करणे ↓ |
| | ३. प्रकल्प व्यवस्थापक (राज्य) ↓ | ८. संचालक (राज्य) प्रकल्प मुल्यन समितीचे मंजुरीपत्र व प्रशासकीय मंजुरी अपलोड करणे → ९ | ११.संचालक(राज्य) ↓ |
| | ४. संचालक (राज्य) ↓ | | १२. व्यवस्थापकीय संचालक ↓ |
| | ५. इरादापत्र प्रणालीद्वारे स्वयंचलित पध्दतीने मिळेल → ६ | | |
| ६. शेतकरी :- सविस्तर प्रकल्प अहवाल अपलोड करणे → ७ | | | १३.अनुदान वितरणास मान्यता ↓ |
| ९. शेतकरी :- बिले व प्रकल्प पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र अपलोड करणे → १० | | | १४.संचालक (राज्य) (Generate RFT) ↓ |
| | | | १५. आहरण व संवितरण अधिकारी :- पीएफएमएस प्रणालीद्वारे अनुदान वितरण |

## ७. राज्य स्तरावरून राबविण्यात येणा-या काढणीपश्चात व्यवस्थापन घटकांची कालमर्यादा :-

### काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित घटकाकरीता कार्यपद्धती.

| अ क्र | बाब | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज करणे | प्रवर्तकाने एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र (फक्त एकात्मिक शितसाखळीमधील) व एकात्मिक शीतसाखळी उभारणीकरीता लाभ घेण्याकरीता https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावा. |
| २ | सोडत (लॉटरी) काढणे | प्राप्त अर्जांची संकेतस्थळावरून आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत जिल्हा/ तालुका स्तरावर तालुका निहाय सोडत काढणे. लक्षांकाप्रमाणे सोडतीमध्ये निवड झालेबाबत संबंधितांना अर्ज करावयाच्या वेळेस नोंदणी केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संदेश प्राप्त होईल. |
| ३ | लाभार्थीने कागदपत्रे अपलोड करणे | प्रवर्तकाने बँक कर्ज मंजुरी/ सहमती पत्र, संक्षिप्त टिपणी तसेच जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे इत्यादी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास / डेस्कला **१५ दिवसांत** सादर करावे. |
| ४ | मान्यतापुर्व स्थळपाहणी **(प्रपत्र- १)** | प्रवर्तकाने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांचेमार्फत मान्यतापुर्व स्थळपाहणी (प्रपत्र- १ प्रमाणे) **१५ दिवसांत** करावी. स्थळपाहणी अहवालासह इतर कागदपत्रे जिअकृअ कार्यालयाने मंडळ कार्यालयाकडे / प्रकल्प व्यवस्थापक यांच्या डेस्कला पाठवावे. |
| ५ | इरादा पत्र देणे. (In Principle Approval) **(प्रपत्र ३)** | मंडळ कार्यालयास जिअकृअ कडून इरादापत्राकरीता प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर बँक कर्ज मंजुरी /सहमती पत्र (राष्ट्रीयकृत व शेड्युलड बँक), जिल्हा अभियान समितीचे शिफारस पत्र **(प्रपत्र २)** व मान्यतापुर्व स्थळपाहणी अहवालाच्या आधारे मा. संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे या कार्यालयाने प्रवर्तकास इरादा पत्र (IPA) **(प्रपत्र ३)** महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन स्वयंचलित पध्दतीने **१५ दिवसांत** द्यावेत. |
| ७ | सविस्तर प्रकल्प बँक कर्ज मंजूरीसह सादर करणे **(प्रपत्र ४)** | इरादा पत्र निर्गमित झालेल्या दिनांकापासून प्रवर्तकाने **तीन महिन्याच्या आत** सविस्तर प्रकल्प मंजूरीस्तव मंडळ कार्यालयास / प्रकल्प व्यवस्थापक यांच्या डेस्कला सादर करावा. |
| ८ | प्रकल्प मूल्यन समितीची शिफारस घेणे | सविस्तर प्रकल्प प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थेकडून तांत्रिक तपासणी व छाननी करून अहवाल प्राप्त झाल्यानंतर परिपुर्ण असलेले प्रस्ताव प्रकल्प मूल्यन समितीची दरमहा / आवश्यकतेनुसार बैठक आयोजित करून योग्य प्रस्तावांना प्रशासकीय मान्यतेसाठी शिफारस करणे. |
| ९ | प्रशासकीय मंजूरी आदेश निर्गमित करणे | प्रकल्प मुल्यन समितीने शिफारश केलेल्या प्रस्तावांना मा. संचालक, मराफऔवमं, पुणे यांच्या मान्यतेने प्रशासकीय मंजुरी आदेश निर्गमित करण्यात येतील. प्रशासकीय मंजुरी मिळालेल्या दिनांकापासुन **बारा महिन्यांच्या आत (शीतवाहन - सहा महिने)** प्रकल्प उभा करणे प्रवर्तकास बंधनकारक राहील. |
| ११ | प्रकल्प उभारणी पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **(प्रपत्र ५)** व देयके अपलोड करणे | प्रर्वतकाने प्रकल्प उभारणी पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **(प्रपत्र ५)** व देयके अपलोड करून मंडळ कार्यालयास / प्रकल्प व्यवस्थापक यांच्या डेस्कला सादर करावे. |
| १२ | प्रकल्प उभारणीपश्चात मोका तपासणी करणे **(प्रपत्र - ६)** | प्रर्वतकाने प्रकल्प पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र व देयके मंडळ कार्यालयास/प्रकल्प व्यवस्थापक यांच्या डेस्कला प्राप्त झाल्यानंरत **१५ दिवसांत** राज्यस्तरीय संयुक्त तपासणी पथकाने प्रत्यक्ष प्रकल्प स्थळावर जाऊन मोका तपासणी करावी. |
| १३ | अनुदान वितरण करणे | राज्यस्तरीय संयुक्त तपासणी पथकाच्या अहवालाच्या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक यांचे मान्यतेने बँकेने सादर केलेल्या बँक कर्ज सबसीडी रिझर्व फंड खाते (Subsidy Reserve Fund Account) परिशिष्ट - B मधील तपशीलानुसार पीएफएमएस प्रणालीद्वारे अनुदान वितरण करण्यात यावे. |

## ८. सर्वसाधारण सुचना :-

८.१ शेतक-यांनी/ नोंदणीकृत गटांनी/ नोंदणीकृत संस्थांनी/ संस्था/ कंपनी/ मालकी संस्थांनी/ भागीदारी संस्थांनी या घटकांतर्गत अर्ज करताना स्वतःच्या मालकीची जमीन असणे आवश्यक आहे. स्वतःच्या मालकीची जमीन नसल्यास शासकीय, निमशासकीय किंवा वैयक्तिक जागेवर प्रकल्प उभारावयाचे असल्यास दुय्यम निबंधकाकडील दिर्घ मुदतीचा (किमान १५ वर्ष) नोंदणीकृत भाडेपट्टा करार ग्राह्य धरण्यात येईल.

८.२ एका कुटुंबातील (कुटुंब म्हणजे आई, वडील व अज्ञान मुले) एकाच व्यक्तीस लाभ अनुज्ञेय राहील.

८.३ भागीदारी संस्था असल्यास भागीदारांपैकी एकाही भागीदाराची यापुर्वी अनुदानीत इतर काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र व एकात्मिक शीतसाखळी प्रकल्पात भागीदारी असल्यास पुनःश्च सदर भागीदार संस्थेस लाभ घेता येणार नाही.

८.४ प्रकल्प उभारणीच्या आधीपासूनच तारण ठेवलेली प्रकल्प जमीन तसेच अर्जदारास जमीन मालकाने मुख्यतार पत्राद्वारे (Power of Attorney) दिलेली जमीन या योजनेंतर्गत पात्र राहणार नाही.

८.५ प्रकल्प हा फलोत्पादन क्षेत्रात असणे बंधनकारक राहील. तसेच प्रकल्प क्षेत्रात असलेले फळपिकाचे क्लस्टर प्रमाणे निवडीस प्राधान्य देण्यात येईल.

८.६ ज्या सर्व्हे नंबर/ जमीनीवर यापुर्वी इतर कोणत्याही शासकीय योजनेतून त्याच घटकासाठी लाभ घेतलेला असल्यास अशा ठिकाणचे प्रस्ताव पुनःश्च अनुदानासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

८.७ प्रकल्प पुर्ण झाल्यावर पुर्ण क्षमतेने व्यापारीदृष्ट्या कार्यरत झाल्यावर संयुक्त तपासणी अहवालाच्या शिफारसीनुसार एक हप्त्यात अनुदान लाभार्थ्याच्या अनुदान राखीव निधी खात्यात जमा करण्यात येईल.

८.८ **एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र या प्रकल्पामध्ये मशिनरी हा महत्त्वाचा भाग असल्याने त्यावर कमीत कमी ६० टक्के खर्च करणे बंधनकारक राहील व प्रकल्पाचे बांधकाम हे गरजेपुरतेच असल्याने त्यावर जास्तीत जास्त ४० टक्के खर्च गृहित धरण्यात येईल.** बांधकाम खर्चामध्ये प्रकल्पाच्या इमारत बांधकाम, विद्युत सुविधा उभारणी, साठवण गृह, आग प्रतिबंधक उपाययोजना इ. सर्व घटकांचा समावेश राहील. तसेच शीतगृह या घटकाकरिता बांधकाम खर्च ५० टक्के, इन्सुलेशन १२.५० टक्के, रेफ्रिजरेशन सिस्टीम २५ टक्के, इलेक्ट्रिकल सिस्टीम १२.५० टक्के प्रकल्प खर्च गृहीत धरण्यात येईल. बांधकाम खर्चामध्ये मेझॅनाइन ग्रेटिंग, आग प्रतिबंधक उपाययोजना, लिफ्ट, रिसीवर डॉक या घटकांचा समावेश राहील तर इलेक्ट्रिकल सिस्टीम खर्चात ट्रान्सफॉर्मर, डी.जी. सेट इ. घटकांचा समावेश राहील.

८.९ **प्रर्वतकास किमान ३६ महिने मुदत कर्ज राखणे बंधनकारक राहील. सबब किमान ३६ महिन्यांच्या आत मुदत कर्ज व अनुदानाची रक्कम निकाली काढता येणार नाही. अनुदानाची रक्कम ही मुदत कर्जाच्या शेवटच्या हप्त्याच्या पुर्नप्राप्तीचा भाग म्हणून समयोजित करण्यात यावी.**

८.१० काढणीत्तोर व्यवस्थापनांतर्गत शीतगृह व एकात्मिक शीतसाखळी या घटकातील मशिनरी व बांधकामाचा विमा उतरविणे बंधनकारक राहील.

८.११ काढणीत्तोर व्यवस्थापनांतर्गत शीतगृह व एकात्मिक शीतसाखळी या घटकातील निर्मित क्षमता ही परिसरातील शेतक-यांना, शेतकरी गटांना किंवा शेतकरी उत्पादक कंपन्यांना भाडेतत्वावर देणे बंधनकारक राहील. तसा लेखी करार व अभिलेखे सविस्तर प्रकल्प अहवालासोबत सादर करणे आवश्यक राहील.

८.१२ एमआयडीएच आणि एनसीसीडीच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे शीतगृहासाठी ३.४ क्युबीक मीटर चेंबर व्हॉल्युम हा १ मे.टन क्षमतेस समतुल्य ग्राह्य धरण्यात येईल. त्याचप्रमाणे रायपनिंग चेंबरसाठी १० मे. टन किंवा जास्त क्षमतेच्या चेंबरकरीता ११ क्युबीक मीटर चेंबर व्हॉल्युम हा १ मे.टन क्षमतेस समतुल्य ग्राह्य धरण्यात येईल. मात्र १० मे. टन क्षमतेपेक्षा कमी क्षमतेच्या चेंबरकरीता १२ क्युबीक मीटर चेंबर व्हॉल्युम हा १ मे.टन क्षमतेस समतुल्य ग्राह्य धरण्यात येईल. तसेच शीतवाहनासाठी ३ क्युबीक मीटर चेंबर व्हॉल्युम हा १ मे.टन क्षमतेस समतुल्य ग्राह्य धरण्यात येईल.

८.१३ एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत रायपनिंग चेंबरकरीता ५० क्युबीक मीटरपेक्षा कमी व्हॉल्युम असलेले चेंबर ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच सदर घटकास जास्तीत जास्त ३०० मे.टन क्षमतेसाठी लाभ अनुज्ञेय राहील.

८.१४ MIDH अंतर्गत शितगृहासाठीचे अर्थसहाय्य हे फलोत्पादन पिकांचे मुल्यवर्धनास चालना देण्यासाठी असल्याने शीतगृहामध्ये केवळ फलोत्पादन पिकांची साठवणूक करणे बंधनकारक राहील.

८.१५ शीतगृहामध्ये बंदी असलेले रेफ्रिजरेंट वापरण्यास मनाई राहील. असे बंदी असलेले रेफ्रिजरेंट वापरलेले आढळून आल्यास प्रकल्प रद्द करण्यात येईल.

८.१६ प्रकल्पाच्या सद्यस्थितीनुसार पुर्ण झालेले तसेच व्यावसायिकदृष्ट्या सुरू असणा-या जुन्या प्रकल्पांना / कार्यान्वित असलेल्या प्रकल्पांना अनुदानासाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत. तथापि विस्तारीकरणाच्या प्रस्तावांना लाभ अनुज्ञेय राहील. मात्र विस्तारीकरणासाठीच्या प्रस्तावांना पुर्वी लाभ देण्यात आलेल्या मे.टन क्षमता ही एकूण ५००० मे.टन क्षमतेमधुन वगळून उर्वरित क्षमतेसाठीच अनुदान अनुदेय राहील. इरादापत्र मिळण्यापुर्वी काम सुरू करण्यात येऊ नये असे निदर्शनास आल्यास सदर प्रस्तावास इरादापत्र देण्यात येणार नाही.

८.१७ बँक कर्ज मंजुरी किंवा बँक कर्ज सहमती पत्राशिवाय कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पांना इरादा पत्र देण्यात येणार नाही. इरादापत्र देताना प्रस्तावास कर्ज मंजुरी / सहमती असणे आवश्यक आहे.

८.१८ काढणीत्तोर व्यवस्थापनांतर्गत एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र व एकात्मिक शीतसाखळी हे घटक दिर्घ मुदत बँक कर्जाशी निगडीत असल्याने लाभार्थ्याने कमीत कमी देय होणा-या अनुदान रकमेएवढे बँक मुदत कर्ज (Term Loan) हे राष्ट्रीयकृत किंवा शेड्युलड बँक यांचेकडून घेणे बंधनकारक राहील. तसेच बँक कर्जाच्या सोबत किमान लाभार्थीचा हिस्सा प्रकल्प खर्चामध्ये असणे आवश्यक आहे.

८.१९ **काढणीत्तोर व्यवस्थापनांतर्गत बँक कर्जाशी निगडीत प्रकल्पांकरीता कृषी पायाभुत सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने ॲग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रकचर फंड (AIF) या योजनेअंतर्गत रक्कम रू. २.०० कोटी मर्यादेपर्यंतच्या सर्व कर्जांवर वार्षिक ३ टक्के सवलत ७ वर्षापर्यंत देण्याबाबतची सुविधा उपलब्ध आहे. सदर योजनेची सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या http://agriinfra.dac.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर योजनेची विविध प्रसार माध्यमांमधुन व्यापक स्वरूपात प्रचार प्रसिध्दी करण्यात यावी.**

८.२० इरादा पत्र म्हणजे पुर्वसंमती/ मान्यता अथवा अर्थसहाय्य मंजुरीचे आदेश नाहीत. इरादा पत्र मिळालेल्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरी घेणे अपरिहार्य राहिल.

८.२१ प्रकल्पास इरादा पत्र मिळाल्यानंतर प्रवर्तकाने तीन महिन्याच्या आत **प्रपत्र ४** प्रमाणे सविस्तर प्रस्ताव मंजुरीस्तव मंडळस्तर / प्रकल्प व्यवस्थापक यांच्या डेस्कला सादर करावेत. **ज्या नावाने इरादापत्र प्रदान करण्यात आलेले आहे. त्या नावे पुर्ण प्रस्ताव सादर करण्यात यावे.**

८.२२ प्रकल्पास मा. संचालक यांचेकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्प अनुदानासाठी ग्राह्य धरण्यात येतील व प्रशासकीय मान्यतेच्या दिनांकापासून बारा महिन्याच्या आत (शीतवाहन - सहा महिने) प्रकल्प पुर्ण करणे बंधनकारक राहील.

८.२३ प्रशासकीय मान्यता देऊन एका महिन्याच्या आत काम सुरू न झाल्यास तसा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांच्या मार्फत स्थळाचा पंचनामा करण्यात येईल व त्याप्रमाणे शक्य झाल्यास काम करण्यास इच्छुक नसलेल्या लाभार्थ्याकडून / प्रवर्तकाकडून तसे लेखी घेण्यात येऊन मंडळ कार्यालयाकडून प्रशासकीय मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

८.२४ प्रकल्पस्थळी कायमस्वरूपी लोखंडी फलक (४ X ३ फुट) लोखंडी ॲंगलवर लावुन सोबत सहपत्रित केलेल्या **प्रपत्र - ८** मधील नमुन्याप्रमाणे माहिती ऑईलपेंटने प्रदर्शित करावी.

८.२५ प्रकल्प व्यवस्थापक, काढणीत्तोर व्यवस्थापन हे या कार्यक्रमाचे समन्वय अधिकारी म्हणून काम पाहतील.

## ९. अंमलबजावणीची कार्यपध्दती :-

**९.१ संकेतस्थळावर अर्ज करणे -** लाभ घेण्यासाठी इच्छुक असणा-या प्रवर्तकांनी https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करावी.

**९.२ सोडत (लॉटरी) काढणे -** काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र व एकात्मिक शीतसाखळी उभारणीसाठी महाडीबीटी प्रणालीवरील अर्जांची ऑनलाईन पध्दतीने आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत जिल्हा / तालुका स्तरावर सोडत काढण्यात येईल. सोडतीमध्ये निवड झाल्यानंतर संबंधितांना अर्ज करावयाच्या वेळेस नोंदणी केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संदेश प्राप्त होईल.

**९.३ मान्यतापुर्व स्थळपाहणी (प्रपत्र १) -**

अ) प्रवर्तकाने बँक कर्ज मंजुरी/ सहमती पत्र, संक्षिप्त टिपणी तसेच जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे इत्यादीसह जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास / डेस्कला सोडतीमध्ये निवड झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावे. प्रवर्तकाने १५ दिवसांच्या आत उपरोक्त कागदपत्रे सादर न केल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येऊन पुढील लाभार्थीस प्राधान्य देण्यात येईल

ब) मान्यता पुर्व स्थळपाहणी **-** कृषि उपसंचालक (जि.अ.कृ.अ.कार्यालय) यांनी वरीलप्रमाणे कागदपत्रे अर्ज प्राप्त झाल्यानंतर स्वतः प्रत्यक्ष स्थळावर जाऊन १५ दिवसात मान्यतापुर्व स्थळ पाहणी **(प्रपत्र- १ प्रमाणे)** करावी. यामध्ये

१. GPS प्रणालीद्वारे प्रकल्प स्थळाचे भौगोलिक स्थान निश्चित करण्यात यावे.
२. अर्जदार/प्रतीनिधी व कृषि उपसंचालक यांचे समवेत अंक्षाश व रेखांशसह (Geotagging) फोटो घेण्यात यावा.
३. प्रकल्पासाठी प्रकल्प उभारणीचे स्थळ, मालकी व क्षेत्र इ. बाबत पडताळणी करावी.
४. राष्ट्रीयकृत किंवा शेड्युलड बँक कर्ज मंजूरी/बँकेचे सहमतीपत्र योग्य असलेबाबत पडताळणी करावी.
५. जिल्हा अभियान समितीचे शिफारस पत्र **(प्रपत्र -२ मध्ये)** सादर करावे.
६. प्रकल्प पुर्व स्थळपाहणी (मोका तपासणी) करते वेळी कर्ज मंजुरी / सहमती असावी तसेच प्रकल्पस्थळी कोणतेही बांधकाम असू नये. मोका तपासणीवेळी कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम सुरू/ अर्धवट/पुर्ण आढळून आल्यास अर्ज त्याच स्तरावर रद्द / निकाली काढण्यात यावेत.
७. वरीलप्रमाणे पडताळणी करून मान्यतापुर्व स्थळपाहणी अहवाल व प्रवर्तकाने सादर केलेली कागदपत्रे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे शिफारशीसह मंडळ कार्यालयास प्रकल्प व्यवस्थापक यांच्या डेस्कला इरादापत्र मिळणेसाठी सादर करावेत.
८. ॲग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रकचर फंड (AIF) या योजनेअंतर्गत रक्कम रू. २.०० कोटी मर्यादेपर्यंतच्या सर्व कर्जांवर वार्षिक ३ टक्के सवलत ७ वर्षापर्यंत देण्याबाबतची सुविधा उपलब्ध असून अर्जदारास सविस्तर माहिती देण्यात यावी.

**९.४ इरादापत्र** - जिअकृअ कार्यालयाकडून प्राप्त प्रस्तावांची मंडळ स्तरावर छाननी करून संकेतस्थळावरील (महाडीबीटी) अर्ज, बँक कर्ज मंजुरी /सहमती पत्र (राष्ट्रीयकृत किंवा शेड्युलड बँक), जिल्हा अभियान समितीचे शिफारस पत्र (प्रपत्र -२) व मान्यतापुर्व स्थळपाहणी अहवाल यांच्या आधारे इरादापत्र **(प्रपत्र ३)** महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन स्वयंचलित पध्दतीने १५ दिवसांत देण्याबाबतची कार्यवाही पुर्ण करण्यात यावी. नवीन व विस्तारीकरणाच्या प्रस्तावांना इरादापत्र देण्यात यावे. मात्र विस्तारीकरणासाठीच्या प्रस्तावांना पुर्वी लाभ देण्यात आलेल्या मे.टन क्षमता ही एकूण ५००० मे.टन क्षमतेमधुन वगळून उर्वरित क्षमतेसाठीच अनुदान अनुदेय राहील.

**९.५ सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सादर करणे -** मंडळ कार्यालयाने इरादा पत्र दिल्यानंतर त्या प्रर्वतकाने स्वःहमीवर **राष्ट्रीयकृत किंवा शेड्युलड बँक** यांचेकडुन प्रकल्पासाठी मुदत कर्ज मंजुर/प्राप्त करून घ्यावे. इरादा पत्र निर्गमित केलेल्या पत्राच्या संदर्भीय दिनांकापासून तीन महिन्याच्या आत प्रकल्पासाठी आवश्यक कागदपत्रे जसे सविस्तर प्रकल्प अहवाल **(प्रपत्र-४)**, बँक कर्ज मंजूरी, बँक अप्रायजल नोट (ज्यामध्ये प्रकल्पाचे संपूर्ण मूल्यमापन, Mortgage & Hypothecations, प्रकल्पस्थळ, प्रस्तावित मशिनरी, वित्तीय व्यवहार्यता (Financial Viability) आणि कर्ज परतावा नमूद असेल) तसेच इतर बाबींचे विश्लेषन असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) हे प्रवर्तकाने महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करून मंडळ कार्यालयास / प्रकल्प व्यवस्थापक यांच्या डेस्कला सादर करावीत. सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये **परिशिष्ट - A** मध्ये नमूद केल्यानुसार चेकलिस्टमध्ये नमूद सर्व कागदपत्रे जोडलेली असावीत. **इरादा पत्र निर्गमित केलेल्या पत्राच्या संदर्भीय दिनांकापासून तीन महिन्याच्या आत प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा प्रकल्पाचे इरादा पत्र संगणकीय प्रणालीद्वारे रद्द होईल.**

**९.६ तांत्रिक तपासणी -** मंडळस्तरावर प्राप्त झालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालातील कागदपत्रांची तांत्रिक व प्रशासकीय पडताळणी सोबतच्या **परिशिष्ट - A** नुसार चेक लिस्ट (Check List) प्रमाणे छाननी करावी. शीतसाखळी प्रकल्पांची एनसीसीडीच्या मार्गदर्शक सुचनांनुसार हिटलोड कॅलक्युलेशन्स, बेसीक डाटा शीट यांची छाननी करणे आवश्यक आहे. त्यासाठी मंडळाने नियुक्त केलेल्या सदर विषयाचे तांत्रिक माहिती असलेल्या National Institute of Post Harvest Technology (NIPHT) या संस्थेमार्फत प्रस्तावांची तांत्रिक छाननी करण्यात यावी. संस्थेकडून प्राप्त झालेला प्रकल्पाचा तांत्रिक तपासणी अहवाल महाडीबीटी पोर्टलवर प्रकल्प व्यवस्थापक यांच्या डेस्कवरून अपलोड करण्यात यावा. तांत्रिक छाननीअंती योग्य असलेले प्रस्ताव प्रकल्प मुल्यन समितीसमोर सादर करावे.

**९.७ प्रकल्प मुल्यन समिती शिफारस -** मंडळस्तरावर प्राप्त झालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालातील कागदपत्रांची **परिशिष्ट - A** नुसार चेक लिस्ट (Check List) प्रमाणे छाननी करावी व तांत्रिक तपासणी करून तपासणी संस्थेने शिफारस केलेल्या / योग्य असलेल्या प्रस्तावांना मा. संचालक, मराफऔवमं, पुणे यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प मुल्यन समितीची दरमहा / आवश्यकतेनुसार बैठक आयोजित करून काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र व एकात्मिक शीतसाखळी प्रस्तावांचे मुल्यनिर्धारण करून प्रशासकीय मान्यतेसाठी संचालक, मराफऔवमं, पुणे यांच्याकडे शिफारस करावी.

- **प्रकल्प मुल्यन समिती रचना व कार्यपध्दती :-**

मंडळस्तरावर प्राप्त होणारे काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र व एकात्मिक शीतसाखळी उभारणीचे बँक कर्ज परतावा अनुदान प्रस्ताव (क्रेडीट लिंक बॅक एण्डेड सबसीडी) तांत्रिकदृष्ट्या योग्य असणे आवश्यक आहे. यासाठी मा. संचालक यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प मुल्यन समितीचे गठन राज्यस्तरीय कार्यकारी समितीच्या निर्देशाप्रमाणे करण्यात आलेले आहे. प्रकल्प मुल्यन समितीची रचना खालील प्रमाणे.

**प्रकल्प मुल्यन समिती -** (Project Appraisal Committee - PAC)

| अ.क्र. | सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | **संचालक, मराफऔवमं** | अध्यक्ष |
| २ | संचालक, मंडळाने नियुक्त केलेली तज्ञ संस्था - NIPHT | सदस्य |
| ३ | कृषि उपसंचालक, मुख्यमंत्री कृषि अन्नप्रक्रिया | सदस्य |
| ४ | रेफ्रिजरेशन विषयाचे तज्ञ अभियंता | सदस्य |
| ५ | इतर विशेष निमंत्रित तज्ञ | सदस्य |
| ६ | प्रकल्प व्यवस्थापक, काढणीत्तोर व्यवस्थापन | सदस्य सचिव |

- **प्रकल्प मुल्यन समितीचे कार्य -**

१. काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र (फक्त एकात्मिक शीतसाखळीमधील) व एकात्मिक शीतसाखळी उभारणीच्या प्रस्तावांची तांत्रिक छाननी करणे. प्रकल्प मुल्यन समितीची सभा दरमहा / आवश्यकतेनुसार आयोजित करणे.

२. तांत्रिकदृष्ट्या योग्य प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरीकरीता शिफारस करणे.

**९.८ प्रशासकीय मान्यता -** प्रकल्प मुल्यन समितीने शिफारस केलेले काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र (फक्त एकात्मिक शीतसाखळीमधील) व एकात्मिक शीतसाखळी प्रस्तावांना संचालक, मराफऔवमं,पुणे यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी. प्रशासकीय मंजुरी दिलेले प्रस्तावच अनुदान दायित्वासाठी ग्राह्य धरण्यात येतील. प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेल्या प्रकल्पाची उभारणी ही प्रशासकीय मंजुरीच्या दिनांकापासुन बारा महिन्यांच्या आत (शीतवाहन - सहा महिन्यांच्या आत) पूर्ण करणे प्रवर्तकास बंधनकारक राहील. प्रकल्प मुल्य समितीचे मंजुरीपत्र (इतिवृत्त) व प्रशासकीय मंजुरी आदेश १५ दिवसांत महाडीबीटी पोर्टलवर संचालक यांच्या डेस्कवरून अपलोड करावेत.

**९.९ प्रकल्प उभारणीपश्चात संयुक्त मोका तपासणी पथकामार्फत तपासणी करणे -** प्रवर्तकाने प्रशासकीय मान्यता मिळाल्याच्या दिनांकापासून १२ महिन्यांच्या आत (शीतवाहन - सहा महिन्यांच्या आत) प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रकल्प व्यावसायिकदृष्ट्या कार्यान्वित झालेबाबत प्रवर्तकाने **प्रपत्र - ५** मध्ये लेखी अहवाल मंडळ कार्यालयास / डेस्कला सादर करावा व त्याचबरोबर **परिशिष्ट - A** नुसार चेक लिस्ट (Check List) मधील **मुद्दा ड** प्रमाणे सर्व कागदपत्रे प्रवर्तकाने सादर करावीत. प्र्वतकाचा लेखी अहवाल प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संयुक्त तपासणी पथकाने प्रत्यक्ष प्रकल्प स्थळावर जाऊन प्रकल्पातील मशिनरी, बांधकाम, देयके, व्यावसायिक उत्पादन, विद्युत सुविधा तसेच मशिनरी व बांधकाम विमा याबाबत **प्रपत्र - ६** प्रमाणे सविस्तर तपासणी करावी. प्रपत्र - ६ मध्ये आवश्यकतेनुसार संचालक स्तरावर सुधारणा करण्यात येतील. त्याचप्रमाणे प्रकल्पाचे ठिकाण फोटोसह भुवन पोर्टलवर जिओ टॅगिंग करावे. त्याआधारे प्रकल्प तांत्रिकदृष्टया व्यवहार्य (Technical Feasibility) व व्यवसायिकदृष्ट्या किफायतशीर असल्यास क्षमतेप्रमाणे अनुदान निर्धारित करून अनुदान वितरणाची शिफारस करावी. संयुक्त मोका तपासणी अहवाल, फोटो व इतर अनुषंगिक कागदपत्रे तपासणी झाल्यानंतर महाडीबीटी पोर्टलवर प्रकल्प व्यवस्थापक यांच्या डेस्कवरून अपलोड करावीत.

- **संयुक्त मोका तपासणी पथकाची (JIT) रचना व कार्यपध्दती :-**

प्रवर्तकाकडून प्रकल्प उभारणी पुर्ण झाल्याबाबतचा लेखी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाची मोका तपासणी संयुक्त मोका तपासणी पथकामार्फत करणेबाबत निश्चित दिनांक संबंधितास व जिअकृअ कार्यालयास कळविण्यात यावे. संयुक्त मोका तपासणी करण्याकरीता पथकाची रचना खालील प्रमाणे.

**संयुक्त मोका तपासणी पथक -** (Joint Inspection Team - JIT)

| अ.क्र. | संयुक्त मोका तपासणी पथक |
|---|---|
| १ | **प्रकल्प व्यवस्थापक, काढणीत्तोर व्यवस्थापन, मराफऔवमं** |
| २ | **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, संबंधित जिल्हा** |
| ३ | संचालक, मंडळाने नियुक्त केलेला तज्ञ संस्थेचा प्रतिनिधी |
| ४ | बँक प्रतिनिधी |
| ५ | प्रकल्प प्रवर्तक / लाभार्थी |

- **संयुक्त मोका तपासणी पथकाचे कार्य -**

काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्रकल्पाधारित एकात्मिक पॅक हाऊस, पुर्व शीतकरण गृह, शीतखोली, शीतगृह, शीतवाहन, रायपनिंग चेंबर, प्राथमिक प्रक्रिया केंद्र (फक्त एकात्मिक शीतसाखळीमधील) व एकात्मिक शीतसाखळी उभारणीच्या प्रकल्पाची प्रत्यक्षस्थळी भेट देऊन उभारण्यात आलेला प्रकल्प एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या मार्गदर्शक सुचनेच्या तांत्रिक मापदंडानुसार व निकषानुसार योग्य असल्याबाबतची खात्री करून अनुदानाची शिफारस करणे.

**९.१० अनुदान वितरण करणे -** योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कमाल अनुदान हे प्रशासकीय आदेशात मंजूर केलेले अनुदान, सयुंक्त तपासणी पथकाने निश्चित केलेले अनुदान व बँकेचे सदर प्रकल्पासाठी प्रत्यक्ष वितरीत केलेले मुदत कर्ज वितरणाचे पत्रात नमूद केलेले कर्ज (Bank Loan Disbursement letter) या पैकी जी रक्कम कमी असेल त्याच रक्कमेचे अनुदान वितरण आदेश निर्गमित करून लाभार्थ्याच्या बँक कर्ज परतावा खात्यावर **(परिशिष्ट - B)** अनुदान PFMS प्रणालीद्वारे वितरीत करावे. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रत्यक्ष कर्ज वितरणापेक्षा (Loan Disbursemnt) जास्त अनुदान जाऊ नये याची खबरदारी घेण्यात यावी. लाभार्थीचे Subsidy Reserve Fund Account मध्ये अनुदान वितरण करणेपुर्वी कर्ज वितरण पत्र (Loan Disbursement letter), हमी पत्र व उभारणी पश्चात फोटो असलेबाबत खात्री करावी.

## १०. घटकांचा सविस्तर तपशील :-

### १०.१ एकात्मिक पॅक हाऊस कन्व्हेअर बेल्ट, संकलन व प्रतवारी केंद्र, वॉशिंग व ड्राईंग यार्ड आणि भारत्तोलन, इ. सुविधांसह (Integrated Pack House with facilities for conveyer belt, sorting, grading units, washing, drying and weighing)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. ५०.०० लाख
- बांधकाम क्षेत्र :- ९ मी x १८ मी.
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या
  अ) सर्वसाधारण क्षेत्र - ३५ टक्के रक्कम रू. १७.५० लाख
  ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के रक्कम रू. २५.०० लाख

➢ **प्रकल्पाचे तांत्रिक निकष :-**

- फळपिके, फुलपिके, भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती पिके यांच्या आवश्यकतेप्रमाणे किमान १६ मे. टन प्रती दिवस म्हणजेच २ मे.टन प्रती तास या क्षमतेच्या एकात्मिक पॅक हाऊसची उभारणी करणे बंधनकारक राहील.
- फळपिकांच्या व वनस्पतींच्या आवश्यकतेप्रमाणे स्वच्छता, प्रतवारी, उत्पादनाचे मुळ रुपात बदल न करता काढणीपश्चात प्रक्रिया पॅकिंग, सिलिंग यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री म्हणजेच 1. Receiving Area 2. Enclosed Covered Sorting & Grading area 3. Sorting & Grading Conveyar Belt (२ मे.टन प्रतीतास या क्षमता) 4. Washing/ Drying Equipment 5. Packaging Area असणे आवश्यक आहे.
- कच्चा माल व तयार मालासाठी साठवणुक सुविधा, हाताळणीसाठी आवश्यक यंत्रणा म्हणजेच Weighing Balance, कायमस्वरूपीचे वॉशिंग युनिट, ट्रॉली, प्लॅस्टिक क्रेटस्, लिफ्टर्स, पाण्याची सुविधा इ. बाबींचा समावेश राहील.
- द्राक्ष पिकांच्या एकात्मिक पॅक हाऊसला अपेडाचे मान्यता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.
- एकूण प्रकल्प खर्चापैकी कमीत कमी ६० टक्के म्हणजेच रू. ३०. ०० लाख मशिनरीसाठी तर उर्वरित ४० टक्के म्हणजेच रू. २०.०० लाख (जास्तीत जास्त) रक्कम बांधकामासाठी अनुज्ञेय राहील.

➢ **अर्थसहाय्याचे स्वरुप :-**

- सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. १७.५० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. २५.०० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

## १०.२ पुर्व शीतकरण गृह (Pre-cooling Unit)/ फिरते पुर्व शितकरण गृह ( Mobile Pre-cooling Unit)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. २५.०० लाख
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या
  अ) सर्वसाधारण क्षेत्र - ३५ टक्के रक्कम रू. ८.७५ लाख
  ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के रक्कम रू. १२.५० लाख

➢ **प्रकल्पाचे तांत्रिक निकष :-**

- पुर्वशीतकरण गृह हे एकात्मिक पॅक हाऊस, शीतगृह , शीतवाहन किंवा शीतखोलीस जोडलेले असावे. **केवळ स्वतंत्र पुर्वशीतकरण गृह घटक अनुज्ञेय राहणार नाही.**
- किमान प्रकल्प क्षमता ६ मे.टन प्रतिदिवस प्रति युनिट असणे आवश्यक राहील.
- शेतातुन निघालेल्या ताज्या फळपिकांची फिल्ड हिट ४ ते ६ तासात काढणे आवश्यक असल्याने त्या क्षमतेचे Evaportaing & Condensing Unit बसविणे बंधनकारक राहील.
- प्रत्येक चेंबरला Air Curtain / Strip Curtain बसविणे बंधनकारक राहील.
- एकूण प्रकल्प खर्चापैकी कमीत कमी ६० टक्के म्हणजेच रू. १५.०० लाख मशिनरीसाठी तर उर्वरित ४० टक्के म्हणजेच रू. १०.०० लाख (जास्तीत जास्त) रक्कम बांधकामासाठी अनुज्ञेय राहील.
- फिरते पुर्व शीतकरण गृह या घटकात वाहन आणि मशिनरीचा खर्च हा भांडवली खर्च म्हणून गृहीत धरण्यात येईल. मात्र वाहन हे याच उद्देशासाठी घेतलेले आहे याबाबत आर.टी.ओ. (R.T.O.) कडे वाहनाची नोंद करणे आवश्यक आहे.

➢ **अर्थसहाय्याचे स्वरुप :-**

- सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. ८.७५ लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १२.५० लाख अर्थसहाय्य देय आहे.

## १०.३ शीतखोली (स्टेजिंग) Cold room (Staging)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. १५.०० लाख / प्रती युनिट
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या
  अ) सर्वसाधारण क्षेत्र - ३५ टक्के रक्कम रु. ५.२५ लाख
  ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के रक्क्म रु. ७.५० लाख

➢ **प्रकल्पाचे तांत्रिक निकष** :-

- कमाल प्रकल्प क्षमता ३० मे.टन प्रतिदिवस प्रति युनिट असणे आवश्यक राहील. शीतखोलीची क्षमता ३० मे.टनापेक्षा कमी असल्यास यथाप्रमाणाआधारे (Prorata Basis) अनुदान अनुज्ञेय राहील. तथापि, किमान प्रकल्प क्षमता ५ मे.टन प्रति युनिट असणे आवश्यक राहील.

- शीतखोलीस Add on घटक म्हणून सौर /अक्षय ऊर्जा स्त्रोत वापरल्यास १०० टक्के Tax invoice प्रकल्प खर्चात ग्राह्य धरण्यात येईल.

## ➢ अर्थसहाय्याचे स्वरुप :-

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमता विचारात घेवुन ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. ५.२५ लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. ७.५० लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

## १०.४ शीतगृह (नविन/विस्तारीकरण/आधुनिकीकरण)

| अ.क्र. | घटक | मापदंड | कमाल मर्यादा | अनुदान | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वसाधारण क्षेत्र | डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र |
| १ | नविन शितगृह युनिट प्रकार- १ (एकसारख्या तापमानात राहणा-या उत्पादनासाठी) (प्रती चेंबर >२५० टन) | रु. ८००० प्रती मे. टन | ५००० मे. टन प्रती लाभार्थी | ३५ टक्के जास्तीत जास्त रु १४०.०० लाख | ५० टक्के जास्तीत जास्त रु.२००.०० लाख |
| २ | शीतगृह युनिट प्रकार - २ (एकापेक्षा अधिक उत्पादने व तापमानासाठी) कमीत कमी ६ चेंबर्स पेक्षा जास्त (प्रती चेंबर <२५० टन) | रु. १०,००० प्रती मे.टन | ५००० मे. टन प्रती लाभार्थी | ३५ टक्के जास्तीत जास्त रु. १७५.०० लाख | ५० टक्के जास्तीत जास्त रु. २५०.०० लाख |
| ३ | शीतगृह युनिट प्रकार - २ (नियंत्रित वातावरणासाठी नविन तंत्रज्ञान राबविणे) | रु. १०००० प्रती मे.टन | ५००० मे. टन प्रती लाभार्थी | ३५ टक्के जास्तीत जास्त रु. १७५.०० लाख | ५० टक्के जास्तीत जास्त रु. २५०.०० लाख |

## ➢ प्रकल्पाचे तांत्रिक निकष :-

- संपूर्ण शीतगृहामध्ये / शीतगृहातील विविध चेंबरमध्ये एकसारखे तापमान आणि आर्द्रता राखण्यासाठी Efficient Heat Transfer असणारा पृष्ठभाग आणि हवेचे पुरेसे अभिसरण होण्यासाठी आवश्यक अशा कॉइल्स आणि डिफ्युजर सिस्टम बसविणे आवश्यक आहे.
- शीतगृहामध्ये आवश्यकतेनुसार वेगवेगळे तापमान ठेवण्यासाठी योग्य असणारी Refrigeration System बसविणे आवश्यक असुन वापरण्यात येणारा “Refrigerant” हा इको-फ्रेन्डली असावा. संपूर्ण Refrigeration System ची कार्यक्षमता पुरेपुर वापरण्यासाठी / वाढवीणेसाठी Monitoring and control mechanism यंत्रणेची व्यवस्था करण्यात यावी.
- आवश्यक क्षमतेचे मल्टी सिलेंडर रेसीप्रोकेटींग किंवा स्क्रुटाईप कॉम्प्रेसर बसविण्यात यावेत.
- प्रत्येक चेंबरला Air Curtain / Strip Curtain बसविणे बंधनकारक राहील.
- शक्य तेवढा विज वापर कमी करण्यासाठी कंन्डेनसरची आखणी / ठेवण अशा प्रकारे करावी की, शीतगृहासाठी विजेचा वापर माफक वेळेसाठीच व्हावा.

- योग्य प्रकारच्या 'थर्मल इन्सुलेशन' चा वापर करावा ज्यामध्ये बाहेरच्या बाजुने व्हेपर बॅरीअर आणि आतील बाजुने क्लॅाडींग / कव्हर मटेरीयलची सुविधा असावी. योग्य प्रकारच्या BIS Standard आणि Code जसे IS-661:2000, IS-661, IS-13205 चे साहित्य इन्सुलेशन साठी वापरावे.
- एमआयडीएच आणि एनसीसीडीच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे शीतगृहासाठी ३.४ क्युबीक मीटर चेंबर व्हॉल्युम १ मे.टन क्षमतेस समतुल्य ग्राह्य धरण्यात येईल.
- अनुभवी आणि शीतगृहासंबंधातील योग्य शिक्षण घेतलेल्या कर्मचा-याची / अधिका-याची तसेच किमान एक कृषि / फलोत्पादन पदवीधारकाची नेमणुक शीतगृह व्यवस्थीत चालविण्यासाठी करावी.
- "एनसीसीडी (NCCD)च्या स्टॅडर्ड नुसार काम होत आहे याबाबतची खात्री होणे आवश्यक आहे.
- प्रत्येक चेंबरमधील तापमान, आर्द्रता पहाण्यासाठी स्वतंत्र Display Instrument असावे तसेच आवश्यकतेनुसार तापमान आणि आर्द्रता बदलण्यासाठी "कन्ट्रोल मॅकॅनिझम" असावे.
- शीतगृहामध्ये फलोत्पादित, औषधी व सुगंधी वनस्पती मालाचे बॉक्सेस, क्रेट्स, बॅग्ज् ठेवण्यासाठी आवश्यक त्या साहित्याचे फ्लोरिंग, रॅकींग करावे. फ्लोरिंग, रॅकींग मध्ये फिरण्यासाठी / माल ठेवण्यासाठी-काढण्यासाठी आवश्यक ते अंतर ठेवावे.
- शीतगृहाशी संलग्न सुविधा जसे हाताने अथवा मशीनद्वारे साफसफाई, निवड, प्रतवारी, पॅकींग, बॅगींग इ. साठी आवश्यक तेवढी जागा आणि सुविधा असणे आवश्यक आहे.
- शीतगृहास जनरेटर बॅक अप असणे बंधनकारक राहील.
- शीतगृहामध्ये साठवण केलेल्या मालास शेतमाल तारण योजने अंतर्गत लाभ देण्यासाठी योग्य ती कार्यवाही/सहकार्य करणे बंधनकारक राहील.
- शीतगृहामध्ये बंदी असलेले रेफ्रिजरेंट वापरण्यास मनाई राहील. असे बंदी असलेले रेफ्रिजरेंट वापरलेले आढळून आल्यास प्रकल्प रद्द करण्यात येईल.
- 'मल्टी चेंबर' शीतगृह ज्यामध्ये नविन/आधुनिक तंत्रज्ञानाचा जसे इन्सुलेशन, हयुमिडिटी कंन्ट्रोल, आधुनिक कुलींग सिस्टीम इ.चा केंद्रशासनाच्या कृषि विभागाने दिलेल्या तपशील आणि मानके (स्पेशिफिकेशन्स आणि स्टँन्डर्स) नुसार वापर करुन कमीत कमी उर्जा वापरली जाईल अशाच शीतगृहांना एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत मंजुरी देण्यात येईल.
- शीतगृहाचे बांधकाम हे बहुमजली स्वरूपाचे होत असल्याने शीतगृह या घटकाकरिता बांधकाम खर्च ५० टक्के, इन्सुलेशन १२.५० टक्के, रेफ्रिजरेशन सिस्टीम २५ टक्के, इलेक्ट्रिकल सिस्टीम १२.५० टक्के प्रकल्प खर्च ग्राह्य धरण्यात येईल. बांधकाम खर्चामध्ये मेझॅनाईन ग्रेटिंग, आग प्रतिबंधक उपाययोजना, लिफ्ट रिसीवर डॉक या घटकांचा समावेश राहील तर इलेक्ट्रिकल सिस्टीम खर्चात ट्रान्साफार्मर, डी.जी. सेट इ. घटकांचा समावेश राहील**.**
- काढणीपश्चात व्यवस्थापन घटकांतर्गत विविध प्रस्तावासाठी आवश्यक असणारी कुलिंग सिस्टम व पॅनेल हे एनसीसीडी च्या मार्गदर्शक सुचनांनुसार असावेत.
- मार्गदर्शक सुचना, एनएचबी व एनसीसीडी चे तांत्रिक तपशील आणि या विषयाचे नियम (प्रोटोकॉल) याचा अवलंब करावा. अधिक माहिती महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाचे संकेतस्थळ (वेबसाईट) http://maharashtra.mahanhm.in, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, नवी दिल्ली यांचे संकेतस्थळ (वेबसाईट) https://midh.gov.in उपलब्ध आहे. तसेच कृषि विभागाच्या https://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

➢ **अर्थसहाय्याचे स्वरुपः-**

- नविन शितगृह युनिट प्रकार- १ एकसारख्या तापमानात राहणा-या उत्पादनासाठी प्रती चेंबर (२५० मे. टन पेक्षा जास्त क्षमतेचे) ५००० मे.टन क्षमतेसाठी प्रति लाभार्थी सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु.१४०.०० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. २००.०० लाख अर्थसहाय्य देय आहे.
- शीतगृह युनिट प्रकार - २ एकापेक्षा अधिक उत्पादने व तापमानासाठी कमीत कमी ६ चेंबर्स पेक्षा जास्त प्रती चेंबर (२५० मे. टन पेक्षा कमी क्षमतेचे) ५००० मे.टन क्षमतेसाठी प्रति लाभार्थी सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. १७५.००लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु.२५०.०० लाख अर्थसहाय्य देय आहे.
- शीतगृह युनिट प्रकार - २ नियंत्रित वातावरणासाठी नविन तंत्रज्ञान राबविणे ५००० मे.टन क्षमतेसाठी प्रति लाभार्थी सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. १७५.००लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. २५०.०० लाख अर्थसहाय्य देय आहे.

## १०.५ नविन तंत्रज्ञान राबविणे व शीतसाखळी आधुनिकीकरण (Technology induction and modernisation of cold-chain)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. २५०.०० लाख
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या
  अ) सर्वसाधारण क्षेत्र - ३५ टक्के
  ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के

➢ **प्रकल्पाचे तांत्रिक निकष :-**

शीतसाखळी आधुनिकीकरणामध्ये PLC उपकरणे, पॅकेजिंग लाईन्स, डॉक लेव्हलर्स, ॲडव्हान्सड् ग्रेडर्स्, पर्यायी तंत्रज्ञान, स्टॅकिंग पध्दत, आधुनिकीकरण इन्सुलेशन आणि रेफ्रिजरेशन याबाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

| Sr. No. | Item | Discription | Admissible Cost |
|---|---|---|---|
| 1 | CA Generator* | Inclusive of sensors, pressure equalising equipment, controls | Rs. 125.00 lakh per unit, maximum 2 generators |
| 2 | Specialised CA Doors* | Add- on specialisation to storage doors for positive pressure chambers. | Rs. 2.50 lakh per door. Maximum 20 doors |
| 3 | CA Tents # | Low cost enclosure of polythyelene PVC, mylar or other impermeable body for existing or new cold stores. | As per original Invoice, maximum 5 enclosures |
| 4 | Programmed Logic Controller(PLC) equipment #@ | Electronic and electrical logic controls for machinery & equipment for existing or new cold stores. | 50 % of cost as per original invoice, maximum Rs. 10. 00 Lakh |
| 5 | Dock Leveler System #@ | In existing or new storages | Max Rs. 7 lakh per unit, max 5 unit |

| Sr. No. | Item | Discription | Admissible Cost |
|---|---|---|---|
| 6 | Warehouse Development & Regulatory Authority (WDRA) / Negotiable Warehouse Receipt (NWR) system, equipment #@ | Computers and printers & software for use with NWR of WDRA | 100 % of cost as per original invoice maximum Rs. 2.00 Lakh. |
| 7 | Specialised Packaging # | Automated packaging lines for fruits & vegetables with farm code labelling, with packaging material. | 100 % of cost as per invoice maximum Rs. 15.00 lakh per project. |
| 8 | High Reach Material Handling Equipment (MHE) *# | Specialised material Handling equipment. | Rs. 17 lakh per unit for max 2 unit. |
| 9 | Modernisation of refrigeration @ | For upgrading of evaporator system, Compressor system | 50% of cost as per original invoice maximum Rs. 100 lakh @ RS. 2500/MT |
| 10 | Modernisation of insulation @ | For repair or modernising of cold chamber insulation | 50% of cost as per original invoice maximum Rs. 100 lakh @ RS. 1500/MT |
| 11 | Reefer Container # | Reefer container for use on existing chassis trailors | Max Rs. 6.00 lakh per 9 MT(20 foot container) |
| 12 | Advanced Grader *#@ | Computrised, Optical Grading Lines with packaging material | 100% of cost as per original invoice max Rs. 75 lakh Per line |
| 13 | Stacking system *#@ | Racking system, Bins, Pallets, for existing or new cold stores | 100 % invoice cost max RS. 2000/MT |
| 14 | Retail Shelf/ equipment # | Temperature controlled retail cabinets or merchandising equipment | Maximum Rs. 10.00 lakhs per establilshment. |
| 15 | Alternate Technology #@ | Vapour Absorption, Phase change material, solar PV panels or Solar Thermal sys | 100%of cost as per invoice maximum Rs.35.00 lakhs per project. |
| Comonents categorization. * CA Add-ons; # Other Add-ons; and @Modernisation | | | |

- आधुनिकीकरणासाठी मुळ प्रकल्पास रू. १००.०० लाखापेक्षा जास्त अनुदान दिलेले असल्यास असे प्रकल्प आधुनिकीकरणासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

➢ **अर्थसहाय्याचे स्वरुप :-**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमतेचा विचार करुन ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अर्थसहाय्य देय आहे.

### १०.६ शीतवाहन (Refrigerated Transport Vehicales)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्चः- रु. २६.०० लाख
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या

अ) सर्वसाधारण क्षेत्र - ३५ टक्के रक्कम रु. ९.१० लाख

ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के रक्कम रु. १३.०० लाख

## ➢ प्रकल्पाचे तांत्रिक निकष :-

- शीतवाहनाची कमाल क्षमता ९ मे.टन असावी ४ मे.टन पेक्षा कमी क्षमता असलेल्या शीतवाहनास अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.
- एमआयडीएच आणि एनसीसीडीच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे शीतवाहनासाठी ३ क्युबीक मीटर चेंबर व्हॉल्युम १ मे.टन क्षमतेस समतुल्य ग्राह्य धरण्यात येईल
- लाभार्थीने सदर वाहनाची नोंद R.T.O. कडे "गुड्स कॅरीअर" म्हणून करणे बंधनकारक आहे. तसेच प्रकल्पासाठी आवश्यक फलोत्पादीत, औषधी व सुगंधी वनस्पती पिकांची बॅकवर्ड व फॉरवर्ड लिंकेजेस असणे आवश्यक आहे.

## ➢ अर्थसहाय्याचे स्वरुप :-

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमतेचा विचार करुन ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. ९.१० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल रु. १३.०० लाख अर्थसहाय्य देय आहे.

## १०.७ रायपनिंग चेंबर (Ripening chamber)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रु. १.०० लाख प्रती मे. टन
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या
  अ) सर्वसाधारण क्षेत्र - ३५ टक्के
  ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के

## ➢ प्रकल्पाचे तांत्रिक निकष :-

- रायपनिंग चेंबरची प्रति युनिट कमाल प्रकल्प क्षमता ३०० मे. टन राहील.
- एनसीसीडी (NCCD)च्या स्टॅंडर्ड नुसार काम करणे बंधनकारक राहील.
- एमआयडीएच आणि एनसीसीडीच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे रायपनिंग चेंबरसाठी १० मे.टन किंवा जास्त क्षमतेच्या चेंबरकरीता ११ क्युबीक मीटर चेंबर व्हॉल्युम १ मे.टन क्षमतेस समतुल्य ग्राह्य धरण्यात येईल. मात्र १० मे.टन क्षमतेपेक्षा कमी क्षमतेच्या चेंबरकरीता १२ क्युबीक मीटर चेंबर व्हॉल्युम १ मे.टन क्षमतेस समतुल्य ग्राह्य धरण्यात येईल.
- ५० क्युबीक मीटर चेंबर व्हॉल्युम पेक्षा कमी क्षमतेचे रायपनिंग चेंबर अनुदानासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

## ➢ अर्थसहाय्याचे स्वरुप :-

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमतेचा विचार करुन ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अर्थसहाय्य देय आहे.

## १०.८ प्राथमिक प्रक्रिया केंद्र {फक्त एकात्मिक शीतसाखळीमधील} (Primary Processing Unit)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रू. २५.०० लाख
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या
  अ) सर्वसाधारण क्षेत्र - ४० टक्के रक्कम रू. १०.०० लाख
  ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५५ टक्के रक्कम रू. १३.७५ लाख

➢ **प्रकल्पाचे तांत्रिक निकष :-**

- प्रकल्पाचा मशिनरी हा महत्त्वाचा भाग असल्याने त्यावर कमीतकमी ६० टक्के खर्च करणे बंधनकारक राहील व प्रकल्पाचे बांधकाम हे गरजेपुरतेच असल्याने त्यावर जास्तीतजास्त ४० टक्के खर्च गृहित धरण्यात यावा. बांधकाम खर्चामध्ये प्रकल्पाच्या इमारत बांधकाम, विद्युत सुविधा उभारणी, वाळवणी आवार, साठवण गृह इ. सर्व घटकांचा समावेश राहील.
- काजु प्रक्रिया केंद्राच्या मापदंड मंडळ कार्यालयाने निर्धारित केल्याप्रमाणे उभारणी करणे बंधनकारक राहील.

➢ **अर्थसहाय्याचे स्वरुप :-**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ४० टक्के रक्कम रू. १०.०० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी रक्कम रू. १३.७५ लाख ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५५ टक्के अर्थसहाय्य देय आहे.

प्राथमिक प्रक्रिया केंद्र हा घटक स्वतंत्रपणे राबविण्यासाठी स्वतंत्ररित्या सदर घटकाच्या मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.

## १०.९ एकात्मिक शीतसाखळी (Integrated Cold Chain)

- अधिकतम ग्राह्य प्रकल्प खर्च :- रू. ६००.०० लाख
- देय अनुदान :- ग्राहय भांडवली खर्चाच्या
  अ) सर्वसाधारण क्षेत्र - ३५ टक्के
  ब) डोंगराळ व अधिसूचित क्षेत्र - ५० टक्के

➢ **प्रकल्पाचे तांत्रिक निकष :-**

- उपरोक्त नमुद १ ते ७ घटकांपैकी कमीत कमी दोन घटकांचा समावेश असावा.
- एनसीसीडी (NCCD)च्या स्टॅंडर्ड नुसार काम करणे बंधनकारक राहील.

➢ **अर्थसहाय्याचे स्वरुप :-**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमतेचा विचार करुन ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अर्थसहाय्य देय आहे.

वरीलप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचा अवलंब तात्काळ करण्यात यावा.

**संचालक**
**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि**
**औषधी व वनस्पती मंडळ, पुणे-५**

## प्रपत्र व परिशिष्ट याबाबत तपशिल

| अ.क्र. | प्रपत्र व परिशिष्ट क्रमांक | विषय |
|---|---|---|
| १ | प्रपत्र - १ | मान्यता पुर्व स्थळपाहणी अहवाल |
| २ | प्रपत्र - २ | जिल्हा अभियान समितीची शिफारस |
